वर्ष १३ वे

अंक १ ला

**एकत्र येणे म्हणजे प्रारंभ, एकत्र राहणे म्हणजे प्रगती**
**आणि एकत्र सातत्याने काम करीत राहणे म्हणजे यश !**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**
**यांचे मुखपत्र**

# संवाद

**नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये**

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च रु.६० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१२**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०१३**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

**आपण यापैकी काय करु शकतो?**

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून ८० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय झाली आहे.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

दि. २२ जुलै, २०१२ रोजी झालेल्या स्नेहमेळाव्यामध्ये आपल्या http://www.parnermitramandalpune.com/ या वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले व ही वेबसाईट आता अपडेटही झालेली आहे. मी मागे नमूद केल्याप्रमाणे मंडळाचे काम जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी या वेबसाईटचा मोठा उपयोग होत आहे. या वेबसाईटवर आपल्या मित्रमंडळाची सर्व माहिती, पारनेर तालुक्यातील भौगोलिक माहिती, महत्वाच्या घडामोडी, व्यक्तीविशेष, देणगीदारांची नावे व पुणे येथे स्थायिक झालेल्या पारनेरकरांचे पत्ते इ. माहिती उपलब्ध आहे. आपण कृपया या वेबसाईटचे अवलोकन करावे व काही सुचना असल्यास त्या आमच्यापर्यंत पोहोच कराव्यात ही नम्र विनंती.

दि. २२ जुलै, २०१२ रोजी आपल्या मित्र मंडळाच्या अध्यक्षपदाची सुत्रे **श्री.हौसाराम घोडके** यांनी **पुण्याचे जिल्हाधिकारी मा.विकास देशमुख** यांचे मार्फत **नूतन अध्यक्ष डॉ.बाळासाहेब बांडे** यांचेकडे सुपूर्त केले. डॉ.बाळासाहेब बांडे यांनी नव्या जोमाने काम सुरू केले असून त्यांना अधिक उत्साहाने काम करण्यासाठी मी आपणा सर्वांतर्फे शुभेच्छा देतो.

मला आपल्याबरोबर चर्चा करताना आनंद होतो की, श्री.हौसाराम घोडके यांच्या पुढाकाराने सुरू केलेल्या **वस्त्र बँकेला** नागरीक व सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी आपले कपडे वस्त्र बँकेला दान दिले. त्यातून मंडळाचे उपाध्यक्ष **श्री. मधुकर शिरोळे** यांनी दि.१५ ऑगस्ट २०१२ रोजी पारनेर तालुक्यातील अक्कलवाडी, व ठाकरवाडी येथील आश्रमशाळांमध्ये जाऊन तेथील आदिवासी बांधवाना या **वस्त्र बँकेतील कपड्यांचे वाटप** केले. हे वाटप केल्यानंतर या आदिवासी बांधवांच्या डोळ्यातून जी कृतज्ञता व्यक्त झाली ती पाहून मंडळ अतिशय योग्य मार्गाने काम करीत आहे याची मनोमन जाणीव झाली. **श्री. हौसाराम घोडके व श्री.मधुकर शिरोळे** यांच्या योगदानाबद्दल त्यांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

वयाच्या सत्तरीतही अतिशय उत्साहाने काम करणारे व मंडळाचे नेतृत्व करणारे श्री.हौसाराम घोडके यांचे प्रती सर्व सभासद नेहमीच आदर व्यक्त करतात. परंतु त्यांच्या समाजाकार्याची बाहेरील जगानेही दखल घेतली व त्यांना पुणे येथील **शिवसह्याद्री फौंडेशनने** पुरस्कार जाहीर केला. दि.०२.०९.२०१२ रोजी पुणे येथे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते **श्री.विनोदजी तावडे,** महसुल आयुक्त **श्री.प्रभाकर देशमुख** व **डॉ.बाबा आढाव** यांच्या हस्ते श्री.घोडके यांना सन्मानित करण्यात आले. त्यामुळे निश्चितच **पारनेर तालुका मित्र मंडळाचे काम व विद्यार्थी वसतिगृहाचे नाव** हे जनसामान्यांपर्यंत पोहोचले आहे असे समजण्यात हरकत नाही. श्री.घोडके हे आपल्या मंडळाचे नेतृत्व करीत असल्याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटतो.

मंडळाचे कार्यकारीणी सदस्य **श्री.सुनील कोल्हे** यांची महाराष्ट्र शासनातर्फे **'विशेष कार्यकारी अधिकारी'** म्हणून तीन वर्षांसाठी निवड करण्यात आली. मी सर्व सभासदांतर्फे त्यांचे अभिनंदन करतो.

आपणा सर्वांची दिवाळी चांगली गेली असेलच. परंतु यावर्षी पाऊस कमी झाल्याने पाणी टंचाईचे संकट आपल्यासमोर आत्ताच उभे ठाकले आहे. या संकटास सामोरे जाण्यासाठी आपण सज्ज व्हावे व आपण याबाबत मंडळास कोणत्या स्वरूपाचे सहकार्य करणार आहात ते कृपया कळवावे म्हणजे या संकटास समर्थपणे तोंड देण्यास आपणास योग्य नियोजन करता येईल.

या संपादकीयास अर्धविराम देण्याअगोदर **'कर्तृत्व पारनेरकरांचे'** या सदरासाठी माहिती देण्यासाठी तसेच **विद्यार्थीनींच्या वसतिगृहासाठी आपणास योगदान द्यावयाचे आहे** यासाठी आठवण करून देणे मी माझे कर्तव्य समजतो. जय जिजाऊ। जय शिवराय।।

**सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना**

**नववर्ष २०१३ सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !**

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

# वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**१) श्री.अशोक वाबळे - मो. ९८८१६०८३५७ २) श्री.मधुकर हौशाभाऊ शिरोळे - मो. ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

रविवार दिनांक **२२.०७.२०१२** रोजी पारनेर तालुका मित्र मंडळाचा स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहामध्ये घेण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा.श्री.विकास देशमुख, जिल्हाधिकारी पुणे** व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार समर्पित केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक **मा.श्री.विजयकुमार ठुबे** (अध्यक्ष, वसतिगृह बांधकाम समिती) यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी पारनेर तालुका मित्र मंडळाच्या १९७९ सालापासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. १० ऑगस्ट २००८ च्या भूमीपुजनानंतर वसतिगृहाच्या बांधकामाने घेतलेल्या गतीबाबतचा सविस्तर अहवाल त्यांनी सादर केला. **''पारनेरकरांचे वसतिगृह असावे''** हे उराशी बाळगलेले स्वप्न साकार करण्यासाठी किती धडपड व धावपळ करावी लागली या संदर्भातील चलत् चित्रपटच जणू त्यांनी उलगडून दाखविला. प्रगतीपथावरच्या कार्याचा उल्लेख करताना या पुढील काळामध्ये मंडळाचा **'मुलींचे वसतिगृह'** उभारण्याचा मनोदय व्यक्त केला. उपस्थितांचे पुन्हा एकदा स्वागत करीत असताना आलेल्या श्रावणसरींचे त्यांनी मनापासून स्वागत केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा.जिल्हाधिकारी श्री.विकास देशमुख** साहेब यांचा परिचय अहमदनगर जिल्हा मित्र मंडळाचे अध्यक्ष **मा.श्री.भास्करराव शेळके** यांनी करून दिला. मा.अध्यक्षांच्या व इतर मान्यवरांच्या हस्ते इ. १० वी १२ वी मध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला. सदर यादी वाचनाचे काम **मा.श्री.मधुकरराव शिरोळे,** उपाध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ यांनी केले.

**मा.जिल्हाधिकारी, श्री.विकास देशमुख** यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात पारनेर तालुका मित्र मंडळाच्या कामाचा गौरव केला. ज्यावेळी तालुक्यामध्ये पारनेर तालुका सहकारी साखर कारखाना उभारण्याविषयी कामे चालू होती त्यावेळी ते अहमदनगर जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यावेळी पारनेरकरांचा खूप जवळून संबंध आल्याचे सांगत असताना **''पारनेरचे लोक अत्यंत स्वाभीमानी, हुशार व कष्टाळू आहेत. स्वतःचे पायावर उभे राहण्याचे त्यांचे कर्तृत्व ते दाखवित असतात.** तालुक्यातील अनेक लोक पुणे, मुंबई सारख्या महानगरामध्ये व्यवसाय तथा नोकरी निमित्ताने वास्तव्यास आहेत. त्यामुळे डोंगराळ भाग असूनही तालुक्याचा आर्थिकदृष्ट्या कायापालट होण्यास मदत झालेली आहे.'' असे गौरवोद्‌गार काढले. आगामी मुलींच्या वसतिगृहाच्या कामास सर्वतोपरी मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना ते म्हणाले, **''भावी आयुष्यात आपल्याला काय आवडते ते पाहून**



*मंडळाच्या स्नेहमेळाव्याचे प्रसंगी डावीकडून श्री.बाजीराव जगदाळे, इंजि.विजयकुमार ठुबे, श्री.साहेबराव मोरे, दीप प्रज्वलन करताना मा.विकास देशमुख, डॉ.बाळासाहेब बांडे, प्रा.गोरक्ष जगताप, श्री.सुनील पोटे व श्री.मधुकर शिरोळे.*




*व्यासपीठावर डावीकडून श्री. बाळासाहेब येणारे, प्रा. गोरक्ष जगताप, श्री.रामदास आंधळे, श्री. साहेबराव मोरे, श्री. बाजीराव जगदाळे, श्री.अशोक वाबळे, श्री. रामा एरंडे, श्री. भास्करराव शेळके, इंजि.विजयकुमार ठुबे, डॉ. बाळासाहेब बांडे, मागे प्रा.डॉ. अरुणा ठुबे, सौ.सुजाता ठुबे व मार्गदर्शन करताना जि.प.सदस्य मा.विश्वनाथजी कोरडे*

**आपल्या शिक्षणाची दिशा ठरवावी. भलेही ते काम कोणतेही असो, त्यासाठी जिद्दीने तयारी करायलाच हवी.''** विद्यार्थ्यांना त्यांनी भावी आयुष्यातील उज्वल यशासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पुणे येथे कार्यरत असलेल्या **प्राध्यापिका डॉ.सौ.अरुणाताई ठुबे** यांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या चांगल्या यशाबद्दल मनापासून कौतुक केले. **''आपल्यासमोर चांगले आदर्श ठेवावेत व ते जोपासावेत.''** तसेच कोणतीही गॅप न घेता आपली कामे वेळेतच पूर्ण करावीत असे सुचविले.

**अहमदनगर जिल्हा परिषदचे नवनिर्वाचित सदस्य मा.श्री.विश्वनाथजी कोरडे** यांनी पारनेर तालुक्यातील



*मा.जिल्हाधिकारी श्री.विकास देशमुख यांचे मार्फत श्री.हौसाराम घोडके यांचेकडून पारनेर तालुका मित्र मंडळाचा पदभार स्विकारताना मंडळाचे नूतन अध्यक्ष डॉ.बाळासाहेब बांडे.*

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत असताना तालुक्यातील पाण्याच्या व जनावरांच्या चाऱ्याच्या बिकट परिस्थितीचे हुबेहुब वर्णन त्यांनी केले. पाण्यासाठी आपण काहीतरी काम केले पाहिजे असे त्यांनी सुचविले. तालुक्यामध्ये टँकरची संख्या कमी आहे. त्यासाठी मंडळास काही करता येईल का या विषयीचा प्रश्न त्यांनी मांडला.

**मंडळाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष डॉ.बाळासाहेब बांडे**



*रक्तदान करताना डावीकडून श्री.सुनील तोटे, सौ.सोनल तोटे, श्री.मधुकर शिरोळे, श्री.विजयकुमार ठुबे व श्री.मुकुंद नेहेरकर.*

यांनी आपल्या मनोगतात सांगितले, **''काम करणाऱ्यांना नवीन क्षितीजे खुणावत असतात.''** के.ई.एम. सारख्या नावाजलेल्या रूग्णालयात महत्वाच्या पदावर असूनसुद्धा डॉ.बांडे यांनी आतापर्यंत मंडळाची एकही मासिक सभा चुकविलेली नाही हे त्यांचे वैशिष्ट्य. त्याचप्रमाणे तालुक्यात सुद्धा अनेक सामाजिक आणि शैक्षणिक कामात त्यांचा सहभाग असतो. **''बाते कम, काम जादा''** असे त्यांच्या कामाचे स्वरूप आहे.

मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.हौसाराम घोडके यांचे ७०वे वर्ष चाललेले असून तरुणाला लाजवील अशा त्यांच्या चांगल्या कामाचे, तसेच निधी संकलनातील सिंहाच्या वाट्याबाबत त्यांचे उपस्थितांनी कौतुक केले. या वार्षिक स्नेहमेळाव्यात त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी उत्तम प्रकारे केले. कार्यक्रमानंतर सर्वांनी मंडळातर्फे ठेवलेल्या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.


यानंतर **पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे व के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या **रक्तदान शिबीरामध्ये महिला, भगिनींसह अनेक सभासदांनी रक्तदान केले.**

**शब्दांकन - श्री.भाऊसाहेब नरड**






## विद्यार्थी अभिनंदन - दहावी



कुमार अभिजीत सहदेव आहेर, रा.पळसरपुर
९५%



कुमारी पायल संजय वैद्य रा.मांडवे खुर्द
९४%



कुमारी पुजा सोपान औटी रा.मांडवे खुर्द
९२%



कुमारी अपुर्वा नंदकुमार झावरे, रा.भोंद्रे
९०.५%




कुमारी शुभानी शिवाजी थिटे, रा.वाळवणे
८९%



कुमार आकाश पोपट सोनवणे, रा.अपधुप
८८%




कुमार शुभम सुरेश वराळ रा.वडझिरे
८६%



कुमारी श्वेता भास्कर खोडदे, रा.किन्ही
८२%



कुमार ऋषीकेश विश्वास काळे, रा.पिंपरी जलसेन
७६%



कुमार मयुर बाळु रसाळ रा.निघोज
७२.५



कुमार अभिजीत परशुराम बोरुडे, रा.सिद्धेश्वरवाडी
७२

कुमारी शिल्पा धनाजी विश्वास, रा.बाभुळवाडे
७१.५

## भावपूर्ण निरोप




**श्री.रामदास किसन आंधळे,** रा.कर्जुले हरेश्वर हे भारतीय स्टेट बँक मुंबई कार्यालयातून मुख्य प्रबंधक या पदावरून **दि.३१.०५.२०१२** रोजी ३१ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यांनी एकंदर ३७ वर्ष नोकरी केली.




**श्री. धोंडीभाऊ गेनबा शेळके,** राहणार वाडेगव्हाण हे जलसंपदा खाते, महाराष्ट्र राज्य या विभागातून ३८ वर्षे ७ महिन्यांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले.



**श्री.विनायक गोविंद अत्रे,** रा.म्हसे हे पुणे महानगर-पालिकेतून ३६ वर्ष ६ महिन्यांच्या सेवेनंतर दि.२९.२.१२ रोजी ऑडीटर या पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.३००१/-** देणगी दिली.



**श्री.बन्सी दगडू औटी,** रा.पारनेर हे ३३ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०६.२०१२** रोजी एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन (मिनीस्ट्री ऑफ लेबर अँड एम्प्लॉयमेंट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया) या विभागातून सहाय्यक आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२,०००/-** देणगी दिली.



**श्री.चंद्रकांत साहेबराव यादव,** रा.रांजणगाव हे ३७ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०७.२०१२** रोजी बँक ऑफ इंडियामधून सिनीयर मॅनेजर या पदावरून सेवीनिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.



**श्री.रामचंद्र आनंदराव शिंदे,** रा.डिकसळ हे किर्लोस्कर न्युमॅटिक्स या कंपनीतून व्हाईस प्रेसिडेंट (ह्युमन रिसोर्सेस) या पदावरून ३६ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०८.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी एकंदर ४४ वर्षे नोकरी केली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५,००१/-** देणगी दिली.



**श्री.चंद्रकांत महादेव कुलकर्णी,** रा.सांगली हे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी खडकी येथून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०९.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

# अभिनंदन

मंडळाचे कार्याध्यक्ष **श्री.हौसाराम विठ्ठलराव घोडके** यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाबद्दल तसेच पारनेर तालुक्यामधून पुण्यामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह



बांधण्याच्या योगदानाबद्दल **गुरुवर्य बाबुराव जगताप शतकोत्तर रौप्यमहोत्सव जयंती** निमित्त **शिवसह्याद्री चॅरिटेबल फाऊंडेशन, पुणे** यांचेतर्फे **मा.विनोद तावडे** (विरोधी पक्षनेते विधान परिषद), **मा.प्रभाकर देशमुख** (विभागीय आयुक्त), **मा.बाबा आढाव** (जेष्ठ समाजेवक), **कुलगुरू प्रभाकर ताकवले,** आदि मान्यवरांच्या हस्ते **विशेष सत्कार** करण्यात आला.



**कु.सायली रघुनाथ रामकर,** रा.राळेगण थेरपाळ हिस १२वी सायन्समध्ये ८२ टक्के मार्कस् मिळाले. तसेच तिला **सीईटी मध्ये १७८ मार्क्स** मिळून तिची **एम.बी.बी.एस. साठी मेरीटवर** निवड झाली.



**श्री.पारूनाथ बजरंग झावरे,** रा.गारगुंडी यांची **मॅथर अँड प्लॅट एम्प्लॉईज युनियन** मध्ये २०१२ ते २०१५ या कालावधीसाठी **कार्यकारीणी सदस्य** म्हणून निवड झाली.



पारनेर तालुका मित्र मंडळाचे कार्यकारिणी सदस्य **सुनील सुर्यभान कोल्हे** यांना महाराष्ट्र शासनातर्फे **''विशेष कार्यकारी अधिकारी''** म्हणून नियुक्त करण्यात आले. यापूर्वी सुद्धा त्यांना कामगार कल्याण मंत्रालयातर्फे **गुणवंत कामगार पुरस्कार** प्रदान करण्यात आला होता.

**श्री.पोपटराव बाळाजी भालेकर,** सहाय्यक वनसंरक्षक पुणे विभाग, रा.रायतळे यांना २०१० ते २०११ या वर्षासाठी राज्य स्तरावरील **''वन व वन्यजीव संरक्षण''** या



कार्यप्रकारात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल **मा.मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण** यांचे शुभहस्ते **रजतपदक** प्रदान करून सन्मानीत करण्यात आले.



**श्री.सोपान रंगनाथ खोसे,** रा.पाडळी दर्या हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा प्रबोधनीमध्ये क्रिडा शिक्षक म्हणून कार्यरत असून गेल्या १० वर्षामध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक राष्ट्रीय खेळाडू तयार झाले. **अथलेटीक्स असोसिएशन पिंपरी चिंचवड**च्या जिल्हा स्तरावर क्रिडा संघटनेमध्ये **कार्यकारीणी सदस्य** म्हणून त्यांची निवड झाली.



**श्री.राहुल बाळासाहेब आहेर,** रा.पळसपुर हे एम.फार्मसी असून त्यांनी मेडीसीन ऑफ केमिस्ट्री मध्ये डॉ.रेड्डी इन्स्टिट्यूट हैद्राबाद येथे संशोधन केले. त्यांची माधवपूर विद्यापीठ, कोलकता येथे **पी.एच.डी.** करण्याकरीता **यु.पी.एस.सी.** तर्फे निवड झाली. संपूर्ण भारतामधील ४२ विद्यार्थ्यांमधून त्यांची एकमेव निवड झाली.



मामासाहेब मोहोळ प्राथमिक विद्यालयातील शिक्षक **श्री. सुरेश विठोबा शेळके** रा.नारायण गव्हाण यांना पुणे महानगरपालिकेतर्फे शिक्षक दिनानिमित्त **''आदर्श शिक्षक''** पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# अभिनंदन



**श्री.नवनाथ सखाराम ढवळे,** एम.एस्सी.(ॲग्री) रा.वडझिरे यांची एम.पी.एस.सी. तर्फे पोलीस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली होती. पण त्या पदावर रुजू न होता त्यांनी पुढील अभ्यासक्रम चालू ठेवला व त्यांची आता पोलीस **उपअधिक्षक (डी.वाय.एस.पी.)** या पदावर निवड झाली.

**प्रा.सुदाम तुकाराम मांडगे,** रा.पिंपळगाव पिसा, ता.श्रीगोंदे यांना पुणे विद्यापीठातर्फे **पी.एच.डी.** पदवी प्रदान करण्यात आली. **''रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या पत्रामधून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कामावरील प्रभावांचा अभ्यास''** हा त्यांचा पी.एच.डी.चा विषय होता. पी.एच.डी.पदवी मिळाल्याबद्दल त्यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.





नामदेवराव मोहोळ विद्यालय, खांबोली, ता.मुळशी, या विद्यालयाचे मुख्याध्यापक **श्री.सुभाष नारायण कारखिले** रा.राळेगण थेरपाळ यांना पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक संघातर्फे गुणवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




**डॉ. अक्षयदीप संभाजीराव पाटील** रा.वासुंदे यांनी एम.बी.बी.एस. नंतर राष्ट्रीय परीक्षा बोर्ड, नवी दिल्ली यांनी संचालित केलेल्या **डी.एन.बी. जनरल मेडीसीन** या पदव्युत्तर परीक्षेत विशेष प्राविण्यासह प्रथम प्रयत्नात सुयश संपादन केले. सदर संस्थेतून संपूर्ण भारतातून ५०० विद्यार्थी बसले. त्यापैकी १२ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



**श्री. अजित सतीश धामणे** रा.सारोळे ता.नगर हे **सनदी लेखापाल (सी.ए.)** च्या अंतिम परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात पास झाले.

# भावपूर्ण निरोप



**श्री.बाळकृष्ण लक्ष्मण निमसे,** रा.डिकसळ हे ३६ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.११.२०१२** रोजी कॅनरा बँकेतून सिनीयर मॅनेजर या पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

# विशेष सूचना

पारनेर तालुका मित्र मंडळाच्या दि.२२.०७.२०१२ च्या स्नेहमेळाव्याचे सर्व फोटो मंडळाच्या वेबसाईटवर टाकलेले आहेत. सभासद व संबंधीत व्यक्तींने ते अवश्य पहावेत.

# वार्षिक स्नेहमेळाव्यानिमित्त रक्तदान शिबीर

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे व के.ई.एम.हॉस्पिटल, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने **दि.२२.०७.२०१२** रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरामध्ये रक्तदान केलेल्या रक्तदात्यांची नावे खालीलप्रमाणे :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | रावसाहेब दादाभाऊ बढे | ११. | डॉ. बाळासाहेब दगडू बांडे | २१. | रविंद्र येवले |
| २. | सौ. सुजाता विजयकुमार ठुबे | १२. | सुनील सुर्यभान कोल्हे | २२. | बाबासाहेब बांडे |
| ३. | प्रतिक विजयकुमार ठुबे | १३. | अशोक विश्वनाथ वाबळे | २३. | नितीन गुंजाळ |
| ४. | बाळासाहेब हरिभाऊ येणारे | १४. | अनंत महादेव मातेरे | २४. | राजेश मानकर |
| ५. | सौ. शीतल बाळासाहेब येणारे | १५. | मुरलीधर कोंडाजी दुस्मान | २५. | अभयसिंह नांगरे |
| ६. | रोहीत दिलीप जाधव | १६. | कु.ऋजुता गणेश ढुमणे | २६. | प्रतिक नेवाळे |
| ७. | सौ. रोहीणी दिलीप जाधव | १७. | गणेश काशिनाथ ढुमणे | २७. | अण्णासाहेब वाघोले |
| ८. | सुनील कुंडलीक पोटे | १८. | गोरक्ष रामकृष्ण तिकोणे | २८. | अंकुश बहिरट |
| ९. | सुनील मुरलीधर तोटे | १९. | दीपक गोरक्ष तिकोणे | २९. | मुकुंद नेहेरकर |
| १०. | मधुकर हौशाभाऊ शिरोळे | २०. | गणेश कुटे | ३०. | दीपक कदम |

# आपण असे केले तर

**श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१२ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे प्रा. जगदीश तुकाराम देंडगे, रा. गांजीभोयरे व श्री. नामदेव मारुती साबळे, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास प्रत्येकी **रु. १०००/-** देणगी दिली**.**



**कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१२ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.अनिकेत यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



**चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१२ च्या वाढदिवसानिमीत्त पिताश्री श्री. तुकाराम विठ्ठल नरसाळे, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



**कै. सौ. सुशिला मारुती पोटघन** रा.जातेगाव यांच्या दिनांक १७.०८.२०१२ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.अविनाश यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.




**कै.सदाशिव किसन शिंदे व कै.श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे अडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. विकास व श्री. प्रविण यांनी प्रत्येकी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै. श्रीमती लक्ष्मीबाई आश्रुजी आग्रे** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.आश्रुजी उर्फ बबनराव व श्री.अशोक यांनी प्रत्येकी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि.२०.०२.२०१३ च्या व **कै.भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१२ च्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.गणेश यांनी मंडळास **रु.११११/-** देणगी दिली.



**कै.आबासाहेब पुंजाजी लगड गुरूजी**, रा.लोणी ता.राहाता यांचे स्मरणार्थ सुपुत्र ॲड. सुरेश आबासाहेब लगड (सहाय्यक सरकारी वकील, अ'नगर जि. न्यायालय) यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै. दत्तात्रय रामचंद्र बोरुडे** रा. करंदी यांच्या दिनांक ३०.१२.२०१२ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.बाळासाहेब यांनी मंडळास **रु.२०००/-** देणगी दिली.



**चि.चैतन्य** यांच्या दि.१७.०८.२०१२ च्या वाढदिवसानिमित्त पिताश्री श्री.भरत त्र्यंबक जगदाळे रा.बाभुळवाडे यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

**चि. राजवीर प्रदीप जाधव** याच्या दि.२९.०९.२०१२ च्या वाढदिवसानिमित्त त्याचे आजोबा श्री. मारुती भिकाजी जाधव रा. जाधववाडी यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



**कै. धोंडाबाई भाऊराव रेपाळे** यांच्या दिनांक २०.०९.२०१२ च्या प्रथम स्मृती-दिनानिमित्त त्यांचे सुपूत्र **ॲड. सहादू भाऊराव रेपाळे** रा.पुणेवाडी यांनी मंडळास **रु.२५,०००/-** देणगी दिली.



**कै. खंडू गेणू थोरात** यांच्या दि.११.११.२०१२ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.राजेंद्र रा.पाडळी आळे यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै.अंबादास बाळाजी दहिवळ,** रा. पिंपरी जलसेन यांच्या दिनांक १६.१०.२०१२ रोजीच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोक यांनी **मंडळास रु. २२०१/-** देणगी दिली.



**कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा.पारनेर यांच्या दिनांक **२३.१०.२०१२** च्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या पत्नी श्रीमती मृदुला यांनी मंडळास **रु.५०००/-** देणगी दिली.

# मंडळातर्फे वस्त्रदान



*वस्त्रदान करताना मंडळाचे उपाध्यक्ष श्री. मधुकर शिरोळे व इतर*

पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे एप्रिल २०१२ च्या अंकामध्ये वस्त्रदानासाठी आवाहन करण्यात आले होते. त्याला भरपूर प्रतिसाद मिळून अनेक सभासद व मित्र मंडळींनी मंडळास वस्त्रदान केले. दि.१४ ऑगस्ट, २०१२ रोजी मंडळाचे उपाध्यक्ष **मा.मधुकरराव शिरोळे** हे स्वतःच्या गाडीमधून पाडळी दर्या या त्यांच्या गावी मुक्कामी गेले. जाताना त्यांनी संपूर्ण गाडी भरून एप्रिल ते ऑगस्ट पर्यंत जमलेले कपडे बरोबर नेले. त्यांना मदत करण्याकरीता **श्री.प्रल्हाद खोसे,** सहाय्यक आयुक्त, नवी मुंबई व **श्री.आप्पा खोसे** हे नवी मुंबईवरून आले होते.

**दि.१५ ऑगस्ट २०१२** रोजी सकाळी ९ वा. ते अनुक्रमे **अक्कलवाडी, बाभुळवाडे** येथील आश्रमशाळा व तेथील **ठाकरवाडी** या ठिकाणी स्वतः जाऊन **साड्या, पँट, शर्ट, लहान मुलांचे मुलींचे कपडे असे वाटप केले.**

सदर वस्त्रदानासाठी **कुमार संतोष लक्ष्मण शिरोळे, सौ.मंदा चिकणे, श्री.किसन केदार, श्री.राहुल विश्वास, श्री.नरवडे** आदि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांना मदत केली. या सर्वांच्या हस्ते वस्त्रदान करण्यात आले.



*मंडळातर्फे वस्त्रदान करताना नवी मुंबई महानगरपालिकेचे सहा.आयुक्त श्री.प्रल्हाद खोसे.*

वस्त्रदान करीत असताना अनेकांच्या चेहऱ्यावर निरागस हास्य दिसत होते. सर्व आदिवासी बंधु भगिनींच्या चेहऱ्यावरचा आनंद लपत नव्हता. हे पाहून मंडळाने केलेल्या कामाचे सार्थक झाले असे निश्चितपणे वाटले. अजुनही पुष्कळ ठिकाणी वस्त्रदान करावयाचे आहे. त्याकरिता सभासदांनी मंडळाशी संपर्क साधावा.

**- मधुकर शिरोळे**

# नांदा सौख्य भरे

- डॉ.दुर्गादास ज्ञानदेव धस रा.बाबुर्डी यांची सुकन्या **सौ.एकता** उर्फ **सुप्रिया** व डॉ.भानुदास आबाजी गायकवाड रा.जातेगाव यांचे सुपुत्र **चि.सुनील** यांचा शुभविवाह **दि. २९.०६.२०१२** रोजी संपन्न झाला. डॉ.धस यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.
- श्री.विजय राम निघोल रा.रुई छत्रपती यांचे सुपुत्र **चि.शैलेश** व श्री.दारासिंह उमरावसिंह चौव्हान रा.बोदवड, जि.जळगाव यांची सुकन्या **सौ.गौरी** यांचा शुभविवाह **दि.२९.०६.२०१२** रोजी संपन्न झाला.
- श्री.राजेंद्र सुरजमल चंगेडीया रा.कासारे यांचे सुपुत्र **चि.रोहीत** व श्री.नविनचंदजी चंपालालजी मुनोत रा.देवदैठणे ता.श्रीगोंदा यांची सुकन्या **सौ.अमृता** यांचा शुभविवाह **दि.१५.०७.२०१२** रोजी संपन्न झाला. श्री.चंगेडीया यांनी मंडळास **रू.२,०००/-** देणगी दिली.
- श्री.गोकुळशेठ दगडू गवळी रा.अपधुप यांचे सुपुत्र **चि.मदन** व श्री.विठ्ठल ईश्वर साठे रा.पाडळी रांजणगाव यांची सुकन्या **सौ.शीतल** यांचा शुभविवाह **दि. २९.११.२०१२** रोजी संपन्न झाला. श्री.गोकुळशेठ गवळी यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.


**Shri. B. P. Khodade & Co.**
(Engineers & Govt. Contractor)


Sangvi, Pune - 411027.



Mobile : 9822563390

Building, Roads & Drainage
**ON HIRE :**
J.C.B., DUMPERS & COMPRESSORS

# निधन वार्ता



**विठ्ठल पाराजी पांढरे,** वय ८० वर्षे, रा. गांजी भोयरे यांचे **दि.०८.०६.२०१२** रोजी निधन झाले.



**सौ.सुनिता मनोहर रांधवन,** वय ४४ वर्षे, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे **दि.०२.०७.२०१२** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ डॉ.मनोहर गोपाळ रांधवन यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



**श्रीमती लक्ष्मीबाई बबनराव सोमवंशी (जहागीरदार)**, वय ८१ वर्षे, रा. शिरसगाव (बोडखा) ता.श्रीगोंदा, मुळ गाव जवळे, ता.पारनेर यांचे **दि.१३.०७.२०१२** रोजी निधन झाले.



**श्रीमती देवूबाई गोदाजी बोरूडे,** वय ८६ वर्षे, रा.पुणेवाडी यांचे **दि.१३.०७.२०१२** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ्य सुपुत्र सोपान यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




**श्रीमती कृष्णाबाई सुखदेव पोटे,** वय ८५ वर्षे, रा.बाभुळवाडे, यांचे **दि.२८.०७.२०१२** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.कुंडलीक यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



**सौ.शारदाबाई मिश्रीलालजी कर्नावट,** वय ६२ वर्षे, रा.वासुंदे यांचे **दि.१८.०७.२०१२** रोजी निधन झाले. त्यांनी जैन धर्मातील पवित्र संथारा व्रत घेतले होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे पती श्री.मिश्रीलालजी पेमराज कर्नावट यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

**शारदाबाई बाबुराव शेळके,** वय ८० वर्षे, रा.वाडेगव्हाण यांचे **दि.०२.०८.२०१२** रोजी निधन झाले.


जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक **धनराजजी रामचंदजी गांधी,** वय ८४ वर्षे, रा.पारनेर यांचे **दि.२२.०८.२०१२** रोजी निधन झाले.




**नागनाथ बंडूजी ठाणगे (गुरूजी)** वय ७८ वर्षे, रा.तिखोल यांचे **दि.०६.०९.२०१२** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.सुरेश यांनी मंडळास **रू.३१००/-** देणगी दिली.



**धोंडीराम बाबुराव भालेकर,** वय ७२ वर्षे, रा.वडनेर हवेली यांचे **दि.०८.०९.२०१२** रोजी निधन झाले.



**मारुती देवराम भामरे,** वय ८६ वर्षे, रा.पिंपळगाव रोठा यांचे **दि.२६.०९.२०१२** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.राजाराम यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



**ह.भ.प.धोंडीबा काशिनाथ रोहोकले,** वय ७६ वर्षे, रा.विरोली यांचे **दि.२७.०९.२०१२** रोजी निधन झाले.



**सौ.अलका ओंकारेश्वर झावरे,** वय ४५ वर्षे, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे २८.०९.२०१२ रोजी निधन झाले.



**श्रीमती गंगुबाई दगडूजी पाटील,** वय ९० वर्षे, रा. कडुस पाडळी यांचे **दि.०१.१०.२०१२** रोजी निधन झाले.



**श्रीमती विजयाबाई सखाराम जगताप,** वय ५८ वर्षे, रा.गोरेगाव यांचे दि.०३.१०.२०१२ रोजी निधन झाले.



**श्रीमती जिजाबाई बाळू ठुबे,** वय ७२ वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे **दि.०७.१०.२०१२** रोजी निधन झाले.



**श्रीमती यमुनाबाई प्रभाकर अनंत,** वय ६१ वर्षे, रा.कासारे यांचे **दि.११.१०.२०१२** रोजी निधन झाले.



**रामचंद्र बाबुराव काळे,** वय ७० वर्षे, रा.पाडळी तर्फे कान्हुर यांचे निधन **दि.०२.११.२०१२** रोजी झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.संतोष यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**निधि संकलन समिती :-**
**श्री. हौसाराम घोडके - अध्यक्ष**
श्री. बाजीराव जगदाळे
प्रा. गोरक्ष जगताप
श्री. भाऊसाहेब नरड
श्री. अशोक वाबळे
श्री. सखाराम गागरे

**बांधकाम समिती :-**
**इंजि. विजयकुमार ठुबे - अध्यक्ष**
श्री. अशोक वाबळे
श्री. मधुकर शिरोळे
श्री. बाळासाहेब येणारे

**वसतिगृह प्रवेश समिती :-**
**श्री. अशोक वाबळे - अध्यक्ष**
श्री. मधुकर शिरोळे
श्री. मुरलीधर चौधरी
श्री. हौसाराम घोडके
श्री. सुनिल कोल्हे
डॉ. बाळासाहेब बांडे

**वसतिगृह व्यवस्थापन समिती :-**
**श्री. मधुकर शिरोळे - अध्यक्ष**
इंजि. विजयकुमार ठुबे
श्री. अशोक वाबळे
श्री. सुनिल कोल्हे
श्री. बाजीराव जगदाळे
श्री. मुरलीधर चौधरी


**सामाजिक उपक्रम समिती :-**
**श्री. सुनिल पोटे - अध्यक्ष**
श्री. मधुकर शिरोळे
श्री. रामदास शिर्के
श्री. बाजीराव जगदाळे
श्री. तारकराम झावरे
श्री. काशिनाथ गायकवाड

**अंतर्गत लेखा परिक्षण समिती :-**
**श्री. रामदास शिर्के - अध्यक्ष**
श्री. सुनिल पोटे
श्री. मधुकर शिरोळे
श्री. सखाराम गागरे

**विद्यार्थी विकास समिती :-**
**श्री. भाऊसाहेब नरड - अध्यक्ष**
श्री. गोरक्ष जगताप
डॉ. बाळासाहेब बांडे
इंजि. विजयकुमार ठुबे

**वाचनालय समिती :-**
**प्रा. गोरक्ष जगताप - अध्यक्ष**
श्री. सखाराम गागरे
श्री. रामदास शिर्के
श्री. भाऊसाहेब नरड
श्री. तारकराम झावरे

मंडळाच्या कामात सुसूत्रता, समन्वय व कामांच्या विभागणीसाठी वरीलप्रमाणे समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.




## -: विशेष सूचना :-

- ☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु झाले असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु झाले आहे.**
- ☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.
- ☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.
- ☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.
- ☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन ‘संवाद’ मधून करण्यात येईल.
- ☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ‘पारनेर भवन’, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ____________________
____________________
____________________
____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०